**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**(अर्थसंकल्पीय विशेष सभा)**

मंगळवार, दि. ३१.३.२०१५ रोजी सायं. ४.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या नविन पम्पींग स्टेशन येथे भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा.अ.सत्तार अ.गफुर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| चव्हाण आनंद शंकरराव | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | स्वामी शैजला किशोर |
| पवळे उमेश देवराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| पांढरे स्नेहा सुधाकर | फारुख अली खा इलियाज खॉ |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | आनेवार गंगासागर संदीप |
| भवरे किशोर दामोधर | कदम शीला कदम |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजियाबेगम अयुबखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | गायकवाड अंजली सुरेशराव |
| देशमूख बालासाहेब गंगाधराव | स.इतरत फातेमा स.मजहुर हुसेन |
| गफारखान गुलाम महमंद खान | धबाळे गणपतराव भिवाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | ज्योती महेंद्र खेडकर |
| गिल सरजितसिंध पंजाबसिंघ | स.शेर अली स.महेबूब अली |
| फारुख हुसेन कासिम साब | राखेवार सतिष शेषप्पा |
| कुरेशी शफी अहेमद | अ.लतिफ अ.मजीद |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | बावजीर शे. हबीब शे. अब्दुल्ला |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | किशोर यादव |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला गजानन | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| घोगरे इंदूबाई शिवाजीराव | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | काबरा रामनारायण रामदेव |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.श्री अ.सत्तार अ.गफुर ,महापौर हे होते तसेच श्री सुशील खोडवेकर आयुक्त,श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, प्रशासन,श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री आलुरकर, स.संचालक, नगररचना. श्री विजय मुंढे, स.आयुक्त, आरोग्य, श्री गिरीष कदम, अभियता. श्री अंधारे, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**विषय क्र. १ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या अधिन राहून मा. आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सादर केलेले सालसन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार केलेल्या शिफारशी नुसार मंजूर करणे बाबत.

**दिपकसिंह रावत** मा.सभापतीनी २०१५-२०१६ चे मूळ अंदाजत्रकामध्ये शहरवासीयांना कोणत्याही कराचा बोजा न टाकता मुलभूत सुविधा देण्याचे नमूद केले आहे. म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो व सोबत

तत्कालिन सभापती सारखेच आपण बुध्दीजीवी लोकांचे सल्ले न घेता स्वयंभू म्हणून हा अर्थसंकल्प महासभेस आणला या महासभेचे सर्व बुध्दीजीवी स.सदस्यातर्फे आपले आभार पण सालसन २०१५.२०१६ चा राज्याचा अर्थसंकल्पात एलबीटी स्थानिक संस्था कर १ ऑगस्ट २०१५ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामूळे मनपाला सर्वात जास्त महसुल देणारा कर म्हणजे एलबीटी होय त्यातच महानगरपालिकेस येणारा महसुल जवळपास ६० टक्के ने कमी होणार आहे. (५९० कोटी ९८ लाख अर्थसंकल्पात तरतूद आहे म्हणजे ६० टक्के महसुलकमी केले तर हा अर्थसंकल्प फुगिर मध्ये रुंपातर होइल.) त्यामूळे

महानगरपालिकेकडून होणा-या अनावश्यक खर्चावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे असे मा. सभापती महोदयानी आपल्या मनोगतात नमूद केलेले आहे. परंतु नियंत्रण कोणकोणत्या खर्चावर, अनावश्यक खर्च कोणता याचा उल्लेख केलेला नाही. कदाचित त्यांना असे म्हणावयाचे असेल अनावश्यक कंत्राटी भरती,आयएलएफएस कंपनी,फोरट्रेस कंपनी,अपिल कन्स.एएमआरसी अंतर्गत दुरुस्ती ईत्यादी बाबीवरील खर्च कमी केला तर आववश्यक खर्च कमी होइल. याबाबीकडे आयुक्त साहेबांनी लक्ष द्यावे. मा.महापौर व आयुक्त यांना निवासस्थानाकरीता भूसंपादन करणे व निवासस्थान बांधणे अधिकारी व कर्मचारी याचेकरीता धराचे बांधकाम करणे या बाबीकरीता अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे,महानगरपालिकेकडे महापौर निवासस्थान आहे. आयुक्तांकरीताही शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे क्वार्टर आहे. असे असतांना या करीता खर्च कशाला .महापौर व आयुक्त अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थानाकरीत जवळपास १० ते १५एकर जागा संपादन करावी लागेल व यासाठी कमीत कमी आजच्या भावाप्रमाणे जवळपास २५ ते ३० कोटी खर्च करावा लागेल. त्यापेक्षा आयुक्तासाहेबांनी महानगरपालिकेची मालकीची जागा मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार नांदेड एज्युकेशन व विद्यानगर येथील १५ एकर जागा ताब्यात घ्यावी व तेथे महापौरांचे आयुक्तांचे निवासस्थाने बांधांवे व सोबत व्यापारी संकुल बाधावे जेणे करुन महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होईल. आणि भुसंपादनाचा खर्च होणार नाही अशी माझी सुचना आहे.

सध्या शहरात पाणी टंचाई आहे पाणी टंचाई संदर्भात कोणती उपाय योजना करावी याची तरतूद नाही. त्यासाठी झोन निहाय रस्त्यावर असणारे किंवा घराबाहेरच्या मोकळया नळावर तोटया लावण्यात याव्यात. त्या तोटयांचीकिंमत सबंधित मालमत्ताधारकांच्या मागणी बिलामध्ये समाविष्ट करण्यात यावी.

स.सदस्या सौ.अनुजा तेहरा यांनी सर्वसाधारण सभेत शंकर सागर जलाशयातील गाळ काढण्यासाठी सुचना केलेली आहे त्यानुसार जलाशयातील गाळ काढण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.त्यासाठी महानगरपालिकेने वेगळा गोदावरी शुध्दीकरण विभाग स्थापन करावा. नाशिक,पुणे महानगरपालिकेने अशा प्रकारचा विभाग स्थापन केलेला आहे या विभागाकरीता उपआयुक्त दर्जाचा अधिकारी देवून गोदावरी शुध्दीकराणासाठी एक प्रोजेक्ट तयार करुन केंद्र शासनास सादर करुन निधी मंजुर करुन घ्यावा. व तसेच याप्रोजेक्टला निधी मिळाला तर गोदावरी नदीचे शुध्दीकरणासोबत गाळ काढल्यानंतर गोदावरी नदीही शुध्द होइल व पाण्याचा साठा आरक्षित राहिल. स्मार्ट सिटी चा प्रोजेकट सोबत गोदावरी नदी शुध्दीकरणाचा प्रोजेक्ट सादर करण्यात यावा अशी माझी सुचना आहे. पान नं.४ वर सन २०१५-२०१६ चे मूळ अर्थसंकल्पात जमा बाजूच्या तक्त्यामध्ये अ.क्र.१ गुंठेवारी विकास मा.आयुक्तानी रु.३.५० कोटीची तरतूद केलेली आहे. स्थायी समितीने रु.५.१५ कोटीची तरतूद केलेली आहे. यामध्ये स्थायी समितीने रु.२.३५ कोटीची तफावत आहे. गुंठेवारी ची मुदत दि.२८.२.२०१५ पर्यत आहे त्यामूळे उत्पन्न वाढीसाठी गुंठेंवारीची मुदत एक वर्षाकरीता वाढविणे आवश्यक आहे.अ.क्र.२ हार्डशिपमध्ये आयुक्तांनी रु.१५ कोटीची तरतूद केलेली आहे. स्थायी समितीने २० कोटीची तरतूद केलेली आहे.यामध्ये ५ कोटीची तफावत आहे. हार्डशिप ची फक्त २५ प्रकरणे प्रलंबित आहेत या २५ प्रलंबित प्रकरणापासून ५ कोटीचे उत्पन्न मिळणार आहे काय याकरीता हार्डशिप नियमामध्ये थोडी शिथिलता करावी म्हणजे मागणी वाढून उत्पन्नात वाढ होईल. अ.क्र.५ स्थानिक संस्था करापासून मागील वर्षी ७० कोटीची तरतूद होती परंतु प्रत्यक्षात ४५.३१ कोटीचे उत्पन्न झालेले आहे म्हणजे २४.६९ कोटीची तफावत आहे. या रक्कमेची कुठून भरपाई करणार आहात. चालू वर्षी स्थानिक संस्था कराची वसुली ५६.३० कोटी आयुकुंतांची तरतूद ७२ कोटी होती यामध्ये १५.७० कोटीची तफावत आहे तसेच आयुक्तंतांची तरतूद ७२ कोटी स्थायी समितीने ८३ कोटीची तरतूद केली. म्हणजे १५.७० कोटीची तफावत ,तसेच आयुक्तांची तरतूद ७२ कोटी केली व स्थायी समितीने त्यात वाढ करुन ८३ कोटीची केली जवळपास २६.७० कोटीची तफावत आहे. एवढी तफावत कशी भरुन काढणार . राज्य शासनाने १ ऑगस्ट २०१५ पासून स्थानिक संस्था कर बंद करण्याचा निर्णय धेतलेला आहे. अ.क्र.४ वर आयुक्तांनी विकास शुल्काची ८.५० कोटीची तरतूद केली .स्थायी समितीने त्यात वाढ करुन ११ कोटीची तरतूद केली म्हणजे ३.५० कोटीची तफावत आहे. बांधकाम परवानगीची ६३ प्रकरणे प्रलंबित आहेत यापासून ३ .५० कोटीचे उत्पन्न होणे शक्य आहे काय . याकरीता उत्पन्न वाढविण्यासाठी टेबलचे कप्पे कमी करुन म्हणजेचे टेक्नीकली स.संचालक, नगररचना,आयुक्त अशी बांधकाम परवानगी फाईल फिरली तर लोकांना बांधकामाची परवानगी लवकर मिळु शकेल. व अनाधिकृत बांधकामांना आळा बसून महाहनगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.अ.क्र.५ वर आयुक्तांनी महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान म्हणून रु.५ कोटीची तरतूद केली आहे अशा प्रकारचे विशेष अनुदान मिळालेले आहे काय ,स्थायी समितीने ४५ विशेष अनुदानाची तरतूद केली आहे. आज पर्यत राज्य शासनाकडून एवढयामोठया प्रमाणात अनुदान मिळालेले आहे काय , पान नं.४ वर मागील वर्षी मालमत्ता करापासुन २४.९५ कोटीची वसुली

झाली मागणी बिले रु.५० कोटीचे होते मागील वर्षाची अंदाजे २५ कोटीची तफावत आहे. चालू वर्षी मागणी बिले ६५ कोटी, वसुली ३४.४३ कोटी यामध्ये ३०.४७ कोटीची तफावत आहे. १८३.४१ कोटीची तफावत आहे. याचा अर्थ दिशाहिन फुगिर बजेट आहे.

सोबत आनंदाची बातमी म्हणजे भांडवली मुल्य आधारीत कर आकारणी पध्दतीने यशस्वीपणे कर आकारणी केल्याबध्दल १३ व्या वित्त आयोगाने कोल्हापुर महानगरपालिकेनंतर नांदेड महानगरपालिकेला विशेष अनुदान म्हणून १३.२५कोटी रुपये दिलेले आहेत.तसे परिपत्रक सुध्दा निघाले आहे. म्हणून सर्व स.सदस्याचे अधिकारी व कर्मचा-याचे अभिनंदन करतो.उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून माझ्या काही सुचना आहे. १) नविन असेसमेट एन.जी.ओ मार्फत करावे त्यामूळे मालमत्तेचे प्रमाण वाढलेले दिसेल. एन.जी.ओ.मालमत्तेच्या सर्वे वर टक्केवारी द्यावी. २) अनाधिकृत नळ कनेक्शनचा सर्व्हे करुन अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित करण्यात यावे.३) ड्रेनेजचे कनेक्शन नियमित करुन घ्यावे.४) बंजारा हॉस्टेल येथील दुकाने लवकरत भाडयाने देण्यात यावी काबरानगर येथील दुकाने भाडयाने देण्यात यावी. मनपाकेच्या मोकळया जागा ताब्यात घेवून त्या ठिकाणी दुकानाचे बांधकाम करुन गाळे भाडयाने देण्यात यावीत जेणे करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढू शकेल. ५) आरटिओ कार्यालयाकडून रस्ते दुरुस्तीचा खर्च म्हणून वाहनांच्या रजिस्ट्रेशन प्रमाणे रॉयल्टी घेण्यात यावी. पान क्र.५ वर अ.क्र.२०, २१ मध्ये फक्त चार झोन केलेले असल्यामूळे चार झोनची दुरुस्ती करण्यात यावी. केंद्रीय विद्यालयाच्या धर्तीवर महानगरपालिकेमार्फत इंग्रजी शाळा सुरु करण्यासाठी मान्यता दिल्याबध्दल मी आयुक्त व सभापती याचे अभिनंदन करतो. या शाळेकरीता जागा संपादन करणे व इमारतीचे बाधकामासाठी रु.१.०० कोटीची तरतूद करण्यात यावी.अ.क.२४ च्या अनुषंगाने झोन क्र.४ वजिराबाद येथे मनपाकेच्या शाळेचे बांधकाम करुन शाळा सुरु करण्यात यावी. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार १ लाख लोकसंख्यासाठी किमान एक निवारागृह उभारणे आवश्यक आहे. नांदेड शहराची लोकसंख्या ५ लक्ष असून त्यानुसार ५ निवारागृह बांधण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. जून्या नादेंड शहरात अग्नींशमन केंद्र सुरु करणे आवश्यक असून शक्तीनगर टाकीजवळ किवा चौफाळा पाण्याच्या टाकीजवळ अत्यांधुनिक अग्नीशमन केंद्र सुरु करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.पेज नं.११ वर पिएमपीओ,आयुर्विमा ,एमजीपी यांच्याकडून कर्ज व नविन ५५ कोटीचे कर्ज घेण्यास शिवसेना पक्षाचा विरोध आहे. परंतु शहर विकास कामाला विरोध नाही. आयुक्त साहेबानी पेज क्र.८ वर महानगरपालिकेच्या मागील तीन वर्षाची खर्च उत्पन्नाची आकडेवारीचा तक्ता दिलेला आहे त्यावरुन

असे दिसून येते की. महानगरपालिकेच्या उत्पन्नात व खर्चात अतिषय वाढ झालेली नाही. एकंदरीत मागील वर्षाचे उत्पन्नाचा विचार करता हे अंदाजपत्रक दिशाहिन व फुगिर बजेट आहे.

**स. शेर अली**

पान नं.२२ वर किशोर वयीन मुलीकरीता तपासणी व समुपदेशन केंद्र सुर करुन या अंतर्गत ५ शाळा आरोग्य शिक्षण व किशोर वयीन मुलीसाठी समुपदेशनाचे कार्यक्रम घेण्यात आले वत्यामध्ये ९४८ मुलींना समुपदेशन करण्यात आल्याचे म्हटलेले आहे परंतु अशा प्रकारचे समूदपेदशन केलेले नाही ही खोटी माहिती आहे ही खोटी माहिती दिल्याबध्दल मी त्याचा निषेध करतो अशा प्रकारची खोटी माहिती सभागृहात देण्यात येवू नये. पान नं.३२ वर अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी शासन अनुदान मंजुर करते परंतु सालसन २०१३ -२०१४ करीता चे प्रस्ताव अद्यप मंजुर झालेले नाही व

सालसन २०१४-२०१५ करीता अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली नाही.शासनाकडून पाठपुरावा करुन अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी अनुदान प्राप्त करण्यात यावे. पांन नं.३५ वर शिक्षण विभागाची माहिती देण्यात आली आहे महानगरपालिकेच्या शाळेत नैसर्गिक वाढ म्हणून वाढीव वर्गाना मान्यता देण्यात यावी. पान नं.४१ वर अग्नीशमन केंद्राची माहिती देण्यात आलेली आहे. जून्या नांदेड शहराकरीता अग्नीशमन केंद्र सुरु करण्यासाठी सर्वसाधारण सभेने दि.२५.११.२०१३ रोजी मान्यता दिलेली असून आज पर्यत अग्नीशमन केंद्र सुरु करण्यात आलेले नाही तरी शक्तीनगर किंवा अबचलनगर भागात नविन अग्नीश्मान केंद्र सुरु करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.विकास आराखडयात ट्रेचिंग ग्रावुडची जागा उद्यानाकरीता आरक्षित करण्यात आलेली असून सदरच्या जागेवर उद्यानाचा विकास करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. कालापुल रुस्त्याचे काम करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद ठेवून या रस्त्याचे कामासाठी निधी उपलब्ध्द करुन देण्याकरीता शासनास विंनती करण्यात यावी. JNNURM,BSUP नगरोत्थान,दलित वस्ती सुधार योजना तसेच इतर विविध योजने अंतर्गत झालेल्या विकास कामाची देखभाल व दुरुस्ती मध्ये रस्ता क्र.२४ बरकत कॉम्प्लेक्स ते ग्यान माता हायस्कुल व देगलुर नाका ते बर्की चौक पर्यतचा रस्ता हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्ती करण्यात यावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या जागेवर एमएसईबी मार्फत विधुत पोल व ट्रान्सफार्मर

बसविण्यात येतातत त्या जागेचे भाडे एमएसईबीकडून वसुल करण्यात यावे.आसरानगर कब्रस्थानला संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्याकरीता व रस्त्याकरीता जागा संपादन करण्याकरीता अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**सविता कंठेवाड** श्री विनय गिरडे पाटील, सभापती ,स्थायी समिती यांनी महिला व बाल कल्याणासाठी विविध शिर्षकात वाढीव तरतूद करण्यासाठी सर्वसाधारण सभेस शिफारस केली त्याबध्दल महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करते. सभागृहास विंनती आहे की स्थायी समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यात बदल न करता त्या कायम ठेवण्यात याव्यात. शिलाई मशिनकरीता १० लक्षाची तरतूद करण्यात आलेली आहे ती वाढवून १५ लक्षाची करण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे. त्यास मान्यता देण्यात यावी.

**रजिया बेगम** सौ.सविता कंठेवाड , सभापती,महिला व बाल कल्याण समिती यांनी जो प्रस्ताव मांडलात्यास माझे अनुमोदन आहे. त्यास मान्यता देण्यात यावी.

**अनुजा तेहरा** सालसन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पात उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घालून व शहराचा सर्वागींण विकास होण्याच्या दृष्टीकोतून तसेच प्रत्येक प्रभागात रु.५०.०० लक्षाची कामे करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूदी करण्याची शिफारस केली त्याबध्दल मी श्री विनय गिरडे पाटील , सभापती ,स्थायी समिती यांचे अभिनंदन करते. आपणा सर्वाना कल्पणा आहे की महानगरपालिकेच्या प्रमुख उत्पन्नाचे मालमत्ता कर व एलबीटी हे दोनच स्त्रोत असून शासनाने या वर्षात एलबीटी कर रध्द करण्याचा निर्णय धेतलेले असल्यामूळे महानगरपालिकेस अनावश्यक खर्चावर कात्री लावावी लागणार आहे. महानगरपालिकेस अत्यावश्क कामासाठी जसे कर्मचा-यांचा पगार, निवृत्ती वेतन, लाईट बिल, इंधन ,ई. करीता प्रतिमहा रु.९.८९ एवढा खर्च होता म्हणजे वर्षाचा ११८.६८ कोटी एवढा खर्च होतो. मालमत्ता करापासुन जवळपास १४० कोटी पर्यत उत्पन्न मिळते, अत्यावश्यक खर्च व उत्पन्नाचा विचार केला तर तर प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी निधीच मिळणार नाही त्यामूळे मोठया प्रमाणात खर्चावर अंकुश ठेवावा लागेल. जेएनएनयूआरएम व बिएसयुपी योजनेच्या कामासाठी मोठया प्रमाणात कंत्राटी तत्वावर कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या असून या दोन्ही योजनेची मुदत संपत असल्यामूळे कंत्राटी तत्वावरील कर्मचा-यांच्या बाबतीत सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा. शासन एलबीटी बंद करणार असल्यामूळे महानगरपालिका मोठया आर्थिक संकटात सापडणार आहे. करीता महानगरपालिकेतील कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चाचा निधी महाराष्ट्र शासनाने दरवर्षी महानगरपालिकेस द्यावा अशा प्रकारची शिफारस शासनास करण्यात यावी. रेल्वे स्टेशन समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते बसस्टॅण्ड हा रस्ता अंत्यंत अरुंद असल्यामूळे वाहतुकीची जास्त वर्दळ असल्यामूळै अपघाताचे प्रमाणे वाढलेले आहे. सदरचा रस्ता रुंद करण्याकरीता एसटी मंहामंडळाची व रस्त्याच्या बाजूची खाजगी जागा संपादन करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. जिल्हयाचे खासदार मा.श्री अशोकरावजी चव्हाण यांनीही रस्त्याची रुंदीकरणासाठी सुचना केली आहे. फेरीवाल्यासाठी दरवर्षी नोंदणी करुन फेरीवाल्याकरीता जागा निश्चित करुन देण्यात यावी. गोवर्धनघाट,नल्लागुटटा चाळ,देगांवचाळ याभागात मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रकात रु.५० लक्षाची तरतूद करण्यात यावी. बोरबन फॅक्ट्रीतील १०० टक्के नागरीक नियमित महानगरपालिकेच्या विविध कराचा भरणा करतात परंतु त्या भागातील रस्ते अत्यंत खराब झालेले असल्यामूळे या भागातील रस्त्याचे हॉटमिक्स हॉटलेड पध्दतीने डांबरीकरण करण्यासाठी अंदाजपत्रकात रु.१.०० कोटीची तरतूद करण्यात यावी.

**करुणा जमदाडे** श्री विनंय गिरडे पाटील,सभापती,स्थायी समिती यांनी नांदेड शहरातील नागरीकांवर कोणत्याही प्रकारच्या कराचा बोजा न टाकता सन २०१५-२०१६ चे अर्थसंकल्प महासभेसमोर सादर केले त्याबध्दल मी त्याचे अभिनंदन करते. नांदेड शहराचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश होणार असून त्याचाच एक भागा म्हणून वाघाळा या भागात रस्ते,नाल्या,पाणी पुरवठा,मलनिस्सारण व्यवस्था व सुशोभिकरण करण्यासाठी सर्वसाधारण सभेने रु.२ कोटीची मान्यता दिली होती परंतु त्या तरतूदीतून एकही विकासाचे काम झालेले नाही. तरी सभागृहास विनंती आहे की, वाघाळा भागासाठी रु.२.०० कोटीची तरतूद करुन या भागात विविध विकासाची कामे करण्यासाठी संबंधितांना सर्व्हे करण्यासाठी आदेशीत करण्यात यावे. मागील वर्षी आंबेडकर चौकाचे सुभोभिकरणासाठी रु.१.००कोटीची तरतूद करण्याचा प्रस्ताव मी मांडला होता व त्याप्रमाणे तरतूदीही करण्यात आली होती परंतु अद्यापही डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करण्यात आलेले नाही.करीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करण्यासाठी १.०० कोटीची तरतूद करुन चौकाचे सुशोभिकरण करण्यात यावे. त्या ठिकाणी राजा सम्राट अशोकांचा स्तंभ उभारण्यात यावा.

**अशोक उमरेकर** महानगरपालिकेच्या वतीने व विविध पक्ष,सामाजिक संघटना,नागरीकांचे वतीने दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते व या निमित्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळयाला पुष्पहार घालण्यासाठी जी पाइपची शिडी बसविण्यात आलेली आहे ती अत्यंत कुचकामी झालेली असून ती तुटण्याची शक्याता आहे त्यामूळे तेथे हैड्रालिक शिडी बसविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. माझे प्रभागात विष्णुनगर भागात व शाहिर अण्णाभाऊ साठे पुतळा परिसरात अनुक्रमे बुध्द विहार व आणाभाऊ साठे सभागृहाचे बांधकामासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**श्रध्दा चव्हाण** श्री विनय गिरडे पाटील यांनी नगरसेवकांचे शिफारशीनूसार प्रत्येक प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी रु.५०-५० लक्षाची तरतूद केलीत्याबध्दल मी श्री विनय गिरडे पाटलांचे अभिनंदन करते. या स्वेच्छता निधिचे कामे तात्काळ काढण्यासाठी आयुक्तंनी कार्यवाही करावी. मागील वर्षाच्या अंदाजपत्रकात सदस्यांना लॅपटॉप देण्याकरीता अंदाजपत्रकात तरतूदी करण्यात आली होती परंतु त्याऐवजी ट्रव्हल बॅक देण्यात आली त्यामूळे सर्व सदस्यांना लॅपटॉप देण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. महासभेतर्फे वेळोवेळी ज्या विविध कमिटया गठित करण्यात येतात त्या कमिटयामध्ये महिला नगरसेवकांना डावलण्यात येते महिलाना ५० टक्के आरक्षण आहे. त्यामूळे कमिटयामध्ये ५० टक्के महिलांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

**उमेश चव्हाण** वार्ड विकास निधीतून पहिल्या टप्यात १२.५० लक्षाची कामे त्वरीत काढण्यात यावी व उर्वरीत १२.५० लक्षाची कामे ऑक्टोरब नोव्हेंबर मध्ये काढण्यासाठी निर्णय धेण्यात यावा.

**बालाजी कल्याणकर** शहरात पाणी टंचाई असल्यामूळे प्रत्येक प्रभागात ५-५ विंधन विहिरी घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**सतिश राखेवार** प्रभाग क्र.२९ मध्ये पोलिस चौकीच्या पाठी मागील मनपाकेच्या मोकळया जागेत व्यायाम शाळेचे बाधंकाम करणे करण्यासाठी अंदाजपत्रकात रु.२०लक्षाची तरतूद करण्यात यावी.

**शफी अहेम कुरेशी** श्री विनंय गिरडे पाटील सभापती,स्थायी समिती यांनी ट्रक टर्मिनल करीता, केंद्रीय विद्यालयाचे धर्तीवर शाळा सुरु करणे , वखार महामंडळाचे जागा संपादित करणे.अशा तीन चार बाबी करीता अंदाजपत्रकात तरतूदी केल्या त्याबदल मी त्यांचे अभिनंदन करतो धन्यवाद देतो परंतु त्यांनी नांदेड शहराकडे दुर्लक्ष केले ,जून्या नांदेड शहरातील नागरीकांना मनोरंजनासाठी एकही उद्यान नाही. मुलानां खेळण्यासाठी एकही खेळाचे मैदान नाही, स्विमीग पुल नाही, लक्ष्मीनर,मल्ली या भागातील रस्ते अत्यंत खराब झालेले असून तेथील नागीकांना पर्यायी रस्ते नाही. सभागृहास विंनती आहे की, जून्या नांदेड भागातीलन नागरीकांठी उद्यान,खेळाचे मैदान ,स्विमीग पुल, पर्यायी रस्ते, ई.बाबी करीता अंदाजपत्रकात विशेष तरतूद करण्यात यावी. सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकात ४ महिण्याचे उत्पन्ा व ८ महिण्याचे उत्पन्नाची जी आकडेवारी दाखविण्यात आलेली

आहे ती वास्तववादी नाही काल्पनीक आहे.त्याचा कुठेही ताळमेळ लागत नाही. केंद्र शासनाने सर्व शिक्षण अधिकार (आरटिईएक्ट) कायदा लागु केलेला असून त्याची अमलबजावणी दोन वर्षापासून सुरु झालेली आहे. शासनाने नॉन सॅलरी ग्रॅड बंद केल्यामूळे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. प्रशासनाने पुर्ववत नॉन सॅलरी ग्रॅड सुरु करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करावा. सर्व शिक्षण अधिकार अंतर्गत केंद्र शासन मोठया प्रमाणात निधीचे वाटप करीत आहे. महानगरपालिकेने केंद्र शासनास या अंतर्गत अनुदानाचे प्रस्ताव सादर करावे.त्याच प्रमाणे केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान सुरु केलेले असून या अंतर्गत केंद्र शासन मोठया प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत करीत आहे. या स्वच्छता अभियांना अंतर्गतही केंद्र शासनास अनुदानाचे प्रस्ताव सादर करण्यात यावे.गोर गरीब नागरीकांकरीता महानगरपालिकेच्या दवाखान्यात पॅथालॉजी, ब्लड बॅक सुरु करण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे परतु अद्याप त्याची अमलबजावणी करण्यात आलेली नाही. या करीताही अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**अंजली गायकवाड** श्री गिरडे पाटील यांनी दलित वस्तीत विकासाची कामे करण्यासाठी भरीव तरतूद केली त्याबदल मी त्यांचे अभिनंदन करते. परंतु दलित वस्तीत विकासाचे काम करण्यासाठी कशा प्रकारे नियोजन करण्यातयेणार आहे याची माहिती देण्यात यावी.

**बाळासाहेब देशमूख** प्रभाग १८ मधील रस्ते अत्यंत खराब झालेले असून या रस्त्याची दुरुस्ती करण्याकरीता अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** डॉ.राम मनोहर लोहिया वाचनालयाकरीता स्वतंत्र इमारत होती परंतु मुख्य कार्यालयाची इमारत बांधकामासाठी वाचनालयाची इमारत पाडण्यात आल्यामूळे डॉ. राम मनोहर लोहिया वाचनालय तरोडेकर मार्केटमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. सामाजिक व शैक्षणिक कार्य म्हणून डॉ.राम मनोहर लोहिया वाचनालयाकरीता स्वतंत्र जागा किंवा इमारत देण्यासाठी गुरुव्दारा बोर्डास विनंती करण्यात यावी. व नांदेड

वाघाळा शहर महानगरपालिका व गुरुव्दारा बोर्ड यांच्या संयुक्तीक विद्यमान भव्य अशी वाचनालयाची इमारत बांधून त्या ठिकाणी वाचनालय सुरु करण्यासाठी महानगरपालिकेचे प्रयत्न करावा

**अशोक उमरेकर** जे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहे ते वास्तववादी नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी उपाय योजना सुचविण्याकरीता माजी उपआयुक्त याचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती कायम करण्यात आली होती या उपसमितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात यावा. महानगरपालिका इमारत साफसफाईच्या कामासाठी दर महिण्याला १० लक्षाचा खर्च करण्यात येत आहे. महानगरपालिकेचे सफाई मजुर हे काम करु शकत नाही काय . विद्युत बिले जास्त येत असून ते नियमाप्रमाणे येत आहे काय .सकाळी ८ वाजे पर्यत दिवे चालू राहतात ,सायं.५ वाजता विद्युत चालू करण्यात येतात विद्युत विभागाने याकडे लक्ष देवुन खर्चात कपात करावी.

**सरजितसिंघ गिल** मागील १० वर्षापासून मार्च महिण्यात महासभेचे अंदाजपत्रकास मंजुर झालेले नव्हते.परंतु या वर्षी श्री विनय पाटील, सभापती स्थायी समिती यांनी वेळेवर अर्थसंकल्पास मान्यता देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केले व महापौर श्री अ.सत्तार अ.गफुर यांनीही ३१ मार्च अगोदर अंदाजपत्रक मंजुरीसाठी विशेष सभा बोलाविली त्याबध्दी मी महापौर श्री अ.सत्तार व सभापती श्री विनय पाटील यांचे अभिनंदन करतो. मागील वर्षी आपण रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी केल्यामूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात ६० ते ६५ कोटीने वाढ झालेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेने एलबीटीच्या, गुंठेवारीच्या उत्पन्नातही भरीव वाढ झालेली आहे त्याबध्दल प्रशासनाचेही अभिनंदन करण्यात येते. एवढे उत्पन्नात वाढ होवूनही स.सदस्यांना आपल्या प्रभागात २५-२५ लक्षाची कामे करण्यासाठी वारंवार संभागृहात भांडावे लागते. महापौरांना विंनती आहे की. प्रत्येक स.सदस्यांच्या शिफरशीनूसार त्याचे प्रभागात एप्रिल मध्ये पहिल्या टप्यात १२.५० लक्षाची कामे व उर्वरीत १२.५० लक्षाची कामे ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये काढण्यासाठी आयुक्तांना आदेशित करावे तसेच स.सदस्यांना लॅपटॉप देण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करुन आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे १ मे २०१५ ला

लॅपटॉपचे वाटप करण्यात यावे.रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची वसुली केल्याबदल शासनाने आपल्या महानगरपालिकेस रु.१३.७० कोटीचे अनुदान दिले त्याबध्दल मी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचा-यांचे अभिनंदन करतो. या अनुदानातून शासन निकषाप्रमाणे आवश्यक ती कामे सर्व स.सदस्यांना विश्वासात धेवून करण्यात यावी. . शहरातील कब्रस्थान,स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी तरतूद करण्यात यावी. अबचलनगरला संरक्षित भिंतीचे बांधकामासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. सर्व स.सदस्यांनी दिलेल्या लेखी निवेदनानुसार त्याचे प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूदी करण्यात याव्यात. व अंदाजपत्रकास मान्यता देण्यात यावी.

**डॉ.करुणा जमदाडे** श्री सरजितसिंघ गिल यांनी पहिल्या टप्यात एप्रिल मध्ये प्रत्येक प्रभागात २५ लक्षाची व ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये २५ लक्षाची स्वेच्छा निधीची कामे काढण्याबाबत सुचना केली आहे त्यांच्या या सुचनेस महापौर व आयुक्तांनी दुजोरा द्यावा.

**महापौर** सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकावर सभागृह नेते, विरोधी पक्षनेते,श्री गिल. श्री शफि कुरेशी व इतर जेष्ठ संदस्यांनी अत्यंत चागल्या सुचना केल्या त्याबध्दल त्याचे अभिनंदन करतो. प्रत्येक स.सदस्यांच्या शिफारशीनूसार त्याचे प्रभागात प्रत्येकी २५-२५ लक्ष याप्रमाणे एका प्रभागाकरीता ५०लक्षाची व एका प्रभागासाठी ७५ लक्षाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.शहर विकासाची कामे सर्वाना विश्वासात घेवून सर्वाचे सहकार्याने पुर्ण करण्याचा प्रयत्न मी माझ्या कार्यकाळात केलेला आहे.काही चुका झालेल्या असतील तर त्या दुरुस्त करण्यात येतील श्री गिल यांनी सुचविल्याप्रमाणे स.सदस्यांचे शिफारशीनूसार त्याचे प्रभागात वार्ड विकास निधी अंतर्गत पहिल्या टप्यात एप्रिल मध्ये १२.५० लक्षाची व दुस-या टप्यात ऑक्टव्नेबर १२.५० लक्षाची कामे आयुक्तांनी काढावीत. शहरात जे बेकायदेशिर मोबाइल टॉवर उभारण्यात आलेले आहे त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. एलबीटीचे,मालमत्ता कराचे गुंठेवारी, ई. उत्पन्नात वाढ व्हावयास पाहिजे. उत्पन्न वाढविण्यासाठी पुर्ण नगरसेवकांची प्रशासनास सहकार्य राहील. महानगरपालिकेने अनेक संस्थाना नागरीकांना नाममात्र दराने जागा दिलेल्या असुन त्या जागेचा मिसयुज होत असल्यामूळै त्या जागा परत घेण्यासाठी सभागृहाने मान्यता दिलेली आहे.आयुक्तांनी त्यावर नियमानुसार कार्यवाही करावी.अंदाजपत्रकात विविध शिर्षकात तरतूदी करण्यासाठी स.सदस्यांनी ज्या लेखी तोंडी सुचना केलेल्या आहेत त्या प्रमाणे ठरावात दर्शविण्यात आल्याप्रमाणे अंदाजपत्रकात तरतूदी करण्यास मान्यता देण्यात येते .आयुक्तानी उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ घालून पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. १ मे २०१५ पुर्वी स.सदस्यांना लॅपटॉप देण्याची कार्यवाही करण्यात यावी. स्वेच्छा निधीतील कामे केंव्हा काढण्यात येतील याचा खुलासा आयुक्तांनी करावी.

**आयुक्त** स.सदस्यांच्या शिफारशीनूसार वार्ड विकास निधी अतर्गत एप्रिल मे २०१५ पर्यत पहिल्या टप्यात प्रत्येकी १२.५० लक्षाची कामे काढण्यात येतील.उर्वरीत वार्ड विकास निधीतील कामे मार्च २०१६ पर्यत मिळणारे अपेक्षित उत्पन्नाचा विचार करुन ऑक्टोब नोव्हेंबर मध्ये काढण्याचा प्रयत्न राहिल.

**ठराव क्र. २५१** **ठराव**

स्थायी समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ठराव क्र. २०१४-२०१५ चे सुधारीत अर्थसंकल्प जसेच्या तसे हि नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते मंजुर करते, तसेच स्थायी समितीने नांवामनपा विशेष सभे समोर सादर केलेले सालसन २०१५-२०१६ चे मूळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून उर्वरीत अंर्थसंकल्पास व अंदाजपत्रकातील आयुक्तांच्या विविध प्रस्तावास जसेच्या तसे ही नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सालसन २०१५-२०१६ चे मुळ अर्थसंकल्प जमा बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | आयुक्तांनी सूचवलेली तरतूद | स्थायी समितीने सूचवलेली तरतूद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|
| 1 | गुंठेवारी विकास | 35000000 | 51500000 | ३०१५००००० |
| 2 | सुधारित विकास नियमावली नुसार हार्डशिप प्रिमियम तसेच कंपाउंडींग फीस | 150000000 | 200000000 | ६०००००००० |
| ३ | विकास शुल्क | 85000000 | 110000000 | १७२९००००० |
| ४ | महाराष्ट्र शासनाचे विशेष अनुदान व इतर केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजने अंतर्गत अनुदान | 50000000 | 450000000 | ७०००००००० |

**सालसन २०१५-२०१६ चे मुळ अर्थसंकल्प खर्च बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा.आयुक्त यांनी सूचविलेली तरतुद | स्थायी समितीने सूचविलेली तरतुद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.25 पाकिजानगर भागातील मोठया नाल्याचे बांधकाम करणे. | - | - | २०००००० |
| २ | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हॉकी गोल्डकप राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करणे | - | - | २५००००० |
| ३ | शहरातील बिडी कामगारासाठी निवासस्थानासाठी जागेचे भूसंपादन करणे | - | - | १००००००० |
| ४ | इदगाह रस्त्याचे रुंदीकरणासाठी (६० फुटाचा) करण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूने जागेचे भुसंपादन करणे | - | - | १००००००० |
| ५ | प्रभाग क्र.१९ वाहेदनगर भागामध्ये हमजद मस्जीद च्या बाजूचे सिमेट रस्ते व नाल्याची कामे करणे | - | - | ३०००००० |
| ६ | प्रभाग क्र.१९ खडकपुरा भागातील महापालिका पाण्याचे टाकी ते तोहराबाग पर्यत ६ इंच व्यासाचीपाईप लाईन टाकण्याकरीता | - | - | ३०००००० |
| ७ | प्रभाग क्र.१९ खडकपुरा भागातील डबल स्टोरीच्या पाठीमागे नविन ड्रेनेज लाइन टाकण्याकरीता | - | - | ३०००००० |
| ८ | खडकपुरा ते समिराबाग ला जाणा-या मुख्य मार्ग (मेनरोड) मधून जाणा-या चुनाल नाल्यावर आर.सी.कलर्व्हटचे बांधकाम व ख्रिश्चन कब्रस्थानला पर्यत रोड करण्याकरीता | - | - | ७०००००० |
| ९ | गुरु ता गध्दी निमित्य पुर्नवसीत अबचलनगर भागात विविध विकास कामे करणे. | - | - | १२५००००० |
| १० | नागिनाघाट स्मशान भूमि आरसीसी शेडचा विस्तार करणे व बंदाघाट एमपीश्री परिसर सुशोभिकरण करणे | - | - | ७५००००० |
| ११ | साईनगर भागात बाबाशेख फरीद दवाखान्याच्या उर्वरीत विकास कामाकरीता | - | - | २४००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | गुरुव्दारा परिसराला लागून गूरु तेग बहादुर नगर मधील रस्त्याचे मजबुतीकरण व सिसि कॉक्रीट रोड करणे | - | - | २५०००००० |
| १३ | दशमेश नगर भागात पन्नु यांचे घरापासून ते प्रगटसिंघ संधू यांचे घरापर्यत सिमेट रोड करणे | - | - | २४०००००० |
| १४ | संत बाबा जोगिंदरसिंघ उद्यानाचे सुशोभिकरण करणे व कम्पाऊड वॉलचे बांधकाम करणे | - | - | २४०००००० |
| १५ | शक्तीनगर जलकुंभ परिसरात वॉलमनकरीता क्वार्टचे बांधकाम करणे व परिसर विकसित करणे. | - | - | ५०००००० |
| १६ | नंदीग्राम भागात श्री लडुसिंघ महाजन याचे कार्यालया पासून ते नारायणसिंघ तबेलेवाले याचेधरापर्यत सिसि रोड करणे | - | - | ३०००००० |
| १७ | गुरुद्वारा लंगर साहिबच्या वतीने नांदेड शहरात होत असलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाकरीता मनपातर्फे 01 लक्ष वृक्षरोपे व टिग्रार्ड खरेदी करुन देणे करीता | ५000000 | १००००००० | १२५०००००० |
| १८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभिकरण | | ३०००००० | १०००००००० |
| १९ | प्रभाग क्र.४० मधील वाघाळा गांवात विविध विकासाची कामे करणेसाठी | - | | ५०००००० |
| २० | जून्या नांदेड शहरासाठी हैदरबाग/शक्तीनगर/अबचलनगर यातिन्हीपैकी प्रशासनास सोईचे होईल त्याठिकाणी अग्नीशमन केंद्र सुरु करणे | | | ५०००००० |
| २१ | रस्ता क्र.२४ ते रस्ता क्र.९ ते ट्रेचिंग ग्रावुंड ते गाडेगावं रस्ता तयार करणे | | | २५०००००० |
| २२ | रस्ता क्र.९ ते गाडेगांव पर्यत शिवरस्ता तसेच ट्रेचिंग ग्रावुंड ते सदर शिव रस्त्यापर्यत टि आकाराच्या रस्त्यासाठी | | | २५०००००० |
| २३ | खुसरोनगर हॉटमिक्स रस्त्यासाठी | | | १०००००० |
| २४ | हैदरबाग पाण्याच्या टाकीखाली वाचनालयाचे बांधकाम करणे | | | १०००००० |
| २५ | हबीब टॉकीज ते काला पुल ते रोड नं.६ पर्यत रस्त्याकरीता | | | ५०००००० |
| २६ | नविन नांदेड आसरानगर कब्रस्थानच्या संरक्षित भिंतीचे बांधकाम | | | २५०००००० |
| २७ | प्रभाग क्र.३९ मधील एनडी ४१ एफ सेक्टर फिरदोस मस्जीदच्या मागील मनपाकेच्या मोकळया जागेत फंक्शन हॉलचे बांधकाम करणे | | | २५०००००० |
| २८ | प्रभाग क्र.३९ एनडी-३१ मधील मोकळया जागेत उद्यानाचे सुशोभिकरण करुण त्या ठिकणी लहान मुलांचे खेळण्याचे साहित्य बसविणे व अभ्यासिक केंद्राचा विकास करणे. | | | १०००००० |
| २९ | प्रभाग क.६ मधील गल्ली नं.१० मध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणेकरीता | | | १०००००० |
| ३० | प्रभाग क्र.६ वर्कशॉप पाण्याची टाकी ते एस.टि.क्वार्टर पर्यत विद्युत पथदिवे बसविणे | | | १०००००० |
| ३१ | प्रभाग क्र.६ गल्ली नं.२० व २१ मध्ये सिसि रोड व आर.सी.सी.नालीचे बांधकाम करणे | | | १०००००० |
| ३२ | प्रभाग क्र.१६ मध्ये व्यायाम शाळेचे बांधकाम करणे | | | १०००००० |
| ३३ | प्रभाग क्र.२० नल्लागुटटा चाळ,देगांवचाळ याभागात मलनिस्सारण लाईन टाकणे | | | ५०००००० |
| ३४ | प्रभाग क.२० बोरबन फॅक्ट्रीमधील अंतर्गत रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे | | | १०००००००० |
| ३५ | डॉ.राम मनोहर लोहिया वाचनालय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी गुरुव्दारा बोर्डास यात्री निवास समोरील वस्तु संग्रालयाच्या बाजूची जागा देण्यास विनंती करुन जागा उपल्बध्द झाल्यास त्या ठिकाणी वाचनलयाचे बाधकाम करणे. | | | १०००००००० |
| ३६ | जून्या नांदेड शहरातील नागरीकांकरीता उद्यान, मुलाना खेळण्याकरीता प्ले ग्रावुड विकसित करण्याकरीता | | | ५०००००० |
| ३७ | प्रभाग क.२८ केळी मार्केट येथील दवाखान्याच्या मोकळया जागेत वाचनालयाचे बांधकाम करुन वाचनालय सुर करणे | | | १५०००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | गुरुव्दारा लंगर साहिबचे बाबा बलविंदरसिंघजी व बाबा नरेंद्रसिंघजी यांना नांदेड भूषण ने सन्मानीत करुन त्यांचा गौरव केला होता व त्यावेळी रु.५१ लक्षाचे बक्षिस जाहिर केले होते ते बक्षिस देण्यासाठी | | | ५१००००० |
| ३९ | जून्या नांदेड मधील विविध प्रभागात जून्या अंत्यत खराब अवस्थेत असलेल्या टयुब सेट व मरक्युरी बदलणे. | | | ३०००००० |
| ४० | प्रभाग क्र.३२ मध्ये विविध ठिकाणी चेंबर बसविणे | | | २०००००० |
| ४१ | प्रभाग क्र.३८ ब एनडी" ४ वसंतराव नाईक कॉलेज समोर आर.सी.सी.नाली व सी.सी.रस्ता करणे | | | १०००००० |
| ४२ | प्रभाग क्र.३८ गणपती मंदिर ते अमरनाथ हॉस्पीटल पर्यत सी.सी.रोड करणे | | | १०००००० |
| ४३ | प्रभाग क्र.३८ एन.डि ४२ मधील कृष्ण मंदिरापासून ते स्मशानभूमी पर्यत सि.सि.रोड करणे | | | १०००००० |
| ४४ | प्रभाग क्र.३८ कै.राजूरवार माजी नगरसेविका याचे घरासमोरील ते एस.टि.पी.पर्यत आर.सी.सी.नाली व सिसि रोड करणे | | | १०००००० |
| ४५ | प्रभाग क्र.३८ गुरुवार बाजार एन.डि १२० मध्ये सार्वजनिक कार्यक्रमासाठी नविन स्टेज तयार करुण त्यावर स्लॅब टाकणे | | | १०००००० |
| ४६ | प्रभाग क्र.९ विद्यानगर येथील हॉटमिक्स करणे | | | २५००००० |
| ४७ | प्रभाग क्र.९ सायन्स कॉलेज ते श्रीनगर मेन रोड पर्यत हॉटमिक्स करणे | | | १५००००० |
| ४८ | प्रभाग क्र.९ विवेक नगर मधील सी.सी.रोड व नालीचे बांधकाम | | | १५००००० |
| ४९ | प्रभाग क्र.९ नांदेड क्लब ते मुख्य कार्यकारी अधिकारी याचे निवासस्थानापर्यत पेव्हर्स ब्लॉक बसविणे | | | ३०००००० |
| ५० | प्रभाग क्र.९ श्री माने साहेब यांचे घर ते पांचाळ याचे घरापर्यत पेव्हर्स ब्लॉक बसविणे | | | १०००००० |
| ५१ | प्रभाग क्र.९ कैलासनगर येथील श्री हनुमान मंदिर ते श्री पठाण याचे घरापर्यत पेव्हर्स ब्लॉक बसविणे | | | १०००००० |
| ५२ | प्रभाग क्र.३७ मध्ये ड्रेनेज लाईन खराब झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी | | | २००००००० |
| ५३ | प्रभाग क्र.३७ सितला माता मंदिर ते गणपती मंदिरापर्यंत सिसि रस्ता करणे | | | २०००००० |
| ५४ | प्रभाग क्र.३७ मुरमुराभटी परिसरात सिसि रोड करणे | | | २०००००० |
| ५५ | प्रभाग क्र.३७ जूना कौठा स्मशानभूमीत विविध विकास कामासाठी | | | १०००००० |
| ५६ | प्रभाग क्र.३७ नरसिंह मंदिर परिसरात सिसिकरणे व पेव्हर्स ब्लॉक बसविणे | | | ७००००० |
| ५७ | प्रभाग क्र. ४ हनुमानगड मंदिरापासून ते सुंदर नगर च्या फलकापर्यत सीसी रोड करणे | | | २०००००० |
| ५८ | प्रभाग क्र.४ हनुमान गड मंदिराजवळील श्री शिवराम पारसेकर याचे घरापासून ते केशवराव गाड याचे घरापर्यत सिसि रोड करणे | | | २०००००० |
| ५९ | प्रभाग क्र.४ जनार्धननगर मधील श्री रातोळीकर याचे घरापासून ते गंगाधर मक्काजी सेलनाड याचे घरापर्यत घरापर्यत सिसि रोड करणे | | | १५००००० |
| ६० | प्रभाग क्र.४ शारदानगर मधील सुखकर्ता अपार्टमेंट येथे ड्रेनेज व आर.सी.सी नालीचे व सीसी रोडचे बांधकाम | | | २५००००० |
| ६१ | त्यागमुर्ती महर्षी दधिची स्तंभाचे बांधकाम करणे | | | १५००००० |
| ६२ | प्रभाग क्र.३३ अरबगल्ली येथील जुनी पाईप लाईन बदलून नविन पाईप लाईन टाकणे | | | १०००००० |
| ६३ | प्रभाग क्र.३२ होळीमध्ये विविध भागात ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता | | | ४०००००० |
| ६४ | प्रभाग क्र.३२ होळीमध्ये विविध भागात रस्त्याचे बांधकाम करणे | | | ५०००००० |
| ६५ | प्रभाग क्र. १९ मध्ये दुलेशाह रहेमान नविन इदगाह ला चबुतरा व सुरक्षा भिंतीचे बाधकाम व इतर कामासाठी | | | १५०००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६६ | प्रभाग क्र. १९ खडकपुरा यैथील पाण्याच्या टाकी खाली बांधकाम करण्यात आलल्या व्यायाम शाळेकरीता साहित्य खरेदी | | | ८००००० |
| ६७ | प्रभाग क्र.३१ मध्ये विविध भागात विकास कामे करण्यासाठी | | | ४०००००० |
| ६८ | प्रभाग क्र.३ मध्ये बजरंग कॉलनी येथे दफन भूमीला संरक्षित भिंतीचे बांधकाम | | | १०००००० |
| ६९ | प्रभाग क्र.३ समाज मंदिर म्हाळजा संरक्षित भिंतीचे बांधकाम | | | ६००००० |
| ७० | प्रभाग क्र.३ मध्ये शिवनेरी नगर येथे रस्ता करणे | | | १०००००० |
| ७१ | छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास हार टाकण्यासाठी पाय-याचे बांधकाम करण्यासाठी | | | ५००००० |
| ७२ | आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या स्त्रीयाकरीता मोफत शिलाई मशिन पुरविणे बाबत. | १४००००० | १०००००० | १५००००० |
| ७३ | प्रभाग क्र.३८ मध्ये एनडि-१ शिवाजी चौक येथील उद्यान विकसित करणे | | | १०००००० |
| ७४ | प्रभाग क्र.३८ मध्ये शिवाजीचौक सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाचे सुशोभिकरण करणे | | | ५००००० |
| ७५ | प्रभाग क्र.३८ एनडि ४२ कृष्ण मंदिर येथे सिसि रस्ता व पेव्हर्स ब्लॉक करणे | | | १०००००० |
| ७६ | प्रभाग क्र.११ बाबानगर मध्ये श्री सरोदे याचे धर ते ते पुंड याचे घरापर्यत सिसि रस्ता करणे | | | १०००००० |
| ७७ | प्रभाग क्र.११ श्री वर्ताळे याचे धर ते श्री विलास भोसले याचे घरापर्यत सिसि रस्ता करणे | | | १०००००० |
| ७८ | प्रभाग क्र.११ मध्ये बाबानगर येथील गणेश मंदिरजवळील उद्यान विकसित करणे | | | १०००००० |
| ७९ | प्रभाग क्र.११ आनंदनगर चौक ते महादेव दाल मिल रस्ता दुरुस्ती करणे व सिलकोट करणे | | | १०००००० |
| ८० | प्रभाग क्र. ३८ मध्ये मुस्लीम समाजाकरीता फक्शन हॉल बाधून देणे बाबत. | | | १०००००० |
| ८१ | प्रभाग क्र.३६ मध्ये डॉ.रायेवार यांचे दवाखान्यामागील मोठा नाला अंडरग्रावुड करुन सीसी करणे | | | २५००००० |
| ८२ | प्रभाग क्र.३६ मध्ये एनडि २ महावीरचौक येथील गणेश मंदिर प्रांगणात विकास कामे करणे | | | १०००००० |
| ८३ | प्रभाग क्र.३६ मध्ये एनडि ४१ महादेवमंदिर प्रांगणात विकास कामे करणे | | | १०००००० |
| ८४ | प्रभाग क्र.३६ मध्ये एनडि ४१ हनुमान मंदिर प्रांगणात विकास कामे करणे | | | १०००००० |
| ८५ | प्रभाग क्र.३६ मध्ये संभाजी चौक म्हसोबा मंदिर परिसरात विकास कामे करणे | | | १०००००० |
| ८६ | प्रभाग क्र.३६ च्या व्यायाम शाळेचे नुतनीकरण करणे व साहित्य खरेदी करणे | | | १०००००० |
| ८७ | प्रभाग क्र.३६ वसरणी याभागात रहिमपुर व वसरणी येथील भाग अविकसित असल्यामूळे विकास कामासाठी | | | ५०००००० |
| ८८ | प्रभाग क्र.५ मधील नाईकनगर येथील विमानतळ पोलिसस्टेशन समोरील शेख याचे घरापासून ते श्री पवार याचे धरपर्यत सिसि रोड करणे व नाईकनगर येथील राजू गांधी महाविद्यालय ते सौंडारे याचे घरापर्यत सिसि रस्ता करणे | | | २०००००० |
| ८९ | प्रभाग क्र.१६ फुले मार्केट येथील सभागृहाचे बांधकाम व दुकाने बांधकाम | | | १०००००० |
| ९० | प्रभाग क.३९ मध्ये एनडी ४१ दिक्षा भूमी विहाराचे सुशोभिकरण करणे तथा तेथे अभ्यास केंद्र व अंगणवाडीचे बांधकाम करणे | | | १५००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९१ | प्रभाग क.३९ मध्ये एनडी १२० मधील मनपाकेच्या मोकळया जागेत शिवाजी हायस्कुल जिजावु सृष्टी कम्पाऊड मागील जागेत सिसि करणे तथा अभ्यास केंद्राचे बांधकाम करणे | | | १०००००० |
| ९२ | प्रभाग क.३९ मध्ये वात्सल्यनगर सोसायटीतील मनपाकेच्या मोकळया जागेत सरंक्षक भिंतीचे बांधकाम | | | १५००००० |
| ९३ | प्रभाग क.३९ मध्ये आणाभाऊ साठे चौका समोरील (पाण्याचे टाकीजवळ स्वच्छता गृह उभारणे ) | | | ३००००० |
| ९४ | प्रभाग क.३९ मध्ये ज्ञानेश्वर नगर चंपतराव मोरे याचे घरासमोरील मनपाकेच्या जागेत सिसि किंवा पेव्हर्सचे बसविणे | | | ४००००० |
| ९५ | प्रभाग क.३९ मध्ये एनडी ४१ इंदिरा गांधी हायस्कुल कॉर्नर जवळील नाल्याजवळ सार्वजनिक स्वच्छता गृहउभारणे | | | ३००००० |
| ९६ | प्रभाग क.३९ मध्ये एनडी ४१ चे १) परिसरात (एसटिपी कॉर्नर) सार्वजनिक स्वच्छता गृहउभारणे ़ | | | ३००००० |
| ९७ | प्रभाग क.३९ मध्ये एनडी ३१ येथील गार्डनचे सुशोभिकरण करणे मुलांसाठी खेळण्याचे साहित्य ,व्यायामाचे साहित्य किंवा अभ्यास केंद्र उभारणे | | | १५००००० |
| ९८ | प्रभाग क.३९ मध्ये एनडी ४१ ,१२०,३१ ज्ञानेश्वर नगर सोसायटी परिसरात १० ते १५ फोकस लाईट बसविणे | | | १००००० |
| ९९ | प्रभाग क्र.३९ एनडी ४१ मध्ये सम्राटनगर ते स्टेडियम कॉर्नर भागाचे नालीचे बांधकाम करणे व त्यावर स्लॅब टाकणे | | | १२००००० |
| १०० | प्रभाग क्र.३९ एनडी १२० आणाभाऊ साठे चौक कॉर्नर ते गंगाबाई पाईकराव याचे घरापर्यत नालीचे बाधकाम करुन त्यावर पाईप टाकणे | | | ३०००००० |
| १०१ | प्रभाग क्र. ५ टिळकनगर येथील नेहरु प्राथमिक विद्यालया समोरील भागात रस्ता करणे | | | २०००००० |
| १०२ | प्रभाग क्र.२९ दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रितीनगर भागात आरसीसी रस्ता करणे | | | २०००००० |
| १०३ | प्रभाग क्र.२९ दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ब्रॅम्हपुरी पंचशिलनगी भागात आरसीसी रस्ता व नाल्याचे बाधंकाम करणे | | | ३०००००० |
| १०४ | प्रभाग क्र.९ कैलासनगर मध्ये एङ शाम बन यांचे घरापासून ते बुलबुले याचे घरापर्यत सिसि रोडकरणे | | | १०००००० |
| १०५ | प्रभाग क्र.९ कैलासनगर भागात श्री टोपे याचे घरापासून ते राहेगावंकर याचे धरापर्यत सिसि रोडकरणे | | | १०००००० |
| १०६ | प्रभाग क्र.९ मधील श्री रावूत याचे घरपासून ते ठाकुर याचे धरापर्यत (रोहित हॉटेल पर्यत ) हॉटमिक्स रस्ता करणे | | | २५००००० |
| १०७ | प्रभाग क्र.१५ येथील गोकुळनगर चौक ते गोरक्षण रोड क.२६ पर्यत मुलभूत सुविधासह सिसि रोड करणे | | | ८०००००० |
| १०८ | प्रभाग क्र.३२ होळी भागातील बागवान गल्ली मस्जीद ते उराडे यांचे धरापर्यत सिसि रोड करणे | | | २०००००० |
| १०९ | प्रभाग क्र.३२ होळी भागातील बागवान गल्ली मस्जीद ते उराडे यांचे धरापर्यत नालीचे बांधकाम करणे | | | १५००००० |
| ११० | प्रभाग क्र.३२ होळी भागात विविध ठिकाणी डांबर रोडकरणे | | | २५००००० |
| १११ | प्रभाग क्र.३२ होळी भागातील विंधन विहिरीवर सब मर्सीबल पंप बसविणे | | | ५००००० |
| ११२ | प्रभाग क्र.३२ होळी भागातील कब्रस्थानास संरंक्षित भिंत व अंतर्गत सिसि रोड करणे | | | १५००००० |
| ११३ | सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील विविध विभागातील प्रलंबित देयकाची अदाई करण्यासाठी | १००००००००० | १००००००००० | ३५००००००० |
| ११४ | मनपा हध्दीतील कौठा मुख्य रस्त्याच्या एका बाजुस कै.बाळासाहेब ठाकरे व दुस-या बाजूस कै.गोपिनाथजी मुंढे यांचे नांव देवून दोन कमानीची बांधकाम करण्यासाठी | | | १०००००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११५ | प्रभाग क्र. ३४ मध्ये धोबीघाट येथे विकास कामासाठी | | | ३०००००० |
| ११६ | प्रभाग क्र.३४ मध्ये मनपाच्या जागेतील सभागृहाच्या वरच्या मजल्यावर वाचनालयाचे बांधकाम व फर्निचर | | | १०००००० |
| ११७ | प्रभाग क्र.१६ नई आबादी भागात सार्वजनिक शौचालय बाधणे | | | ३००००० |
| ११८ | प्रभाग क्र. १६ मध्ये एचआयजी कॉलनी भागात उद्यान विकसित करणे | | | ५००००० |
| ११९ | प्रभाग क्र. १६ मध्ये पिवळी गिरणी भागात लहान मुलासाठी बालवाडीचे बांधकाम करणे | | | ५००००० |
| १२० | प्रभाग क्र. १६ त्रिरत्न बुद विहाराचे सुशोभिकरण करणे | | | ३००००० |
| १२१ | प्रभाग क्र. १६ त्रिरत्न बुद विहाराचे सुशोभिकरण करणे | | | ३००००० |
| १२२ | प्रभाग क्र. १६ जनता कॉलनी येथील बुद विहार परिसराचे सुशोभिकरण करणे | | | ३००००० |
| १२३ | प्रभाग क्र. १६ नई आबादी येथील कब्रस्थान मध्ये १० ते १५फोकस लाईट बसविणे | | | ३००००० |
| १२४ | प्रभाग क्र. १६ जनता कॉलनी मध्ये सिसि रोड नाल्या व त्यावर स्लॅब टाकणे | | | ५००००० |
| १२५ | प्रभाग क्र. १६ मोरे यांच्या घरापासून ते समाज मंदिर ते पंचनामा ऑफिस पर्यंत सिसि रोड व दोन्ही बाजूने नाल्याचे बांधकाम करणे | | | १०००००० |
| १२६ | प्रभाग क्र. १६ आंबेडकर शाळेसमोर सिसि रोड .नाल्या,व त्यावर स्लॅब टाकणे करणे | | | १०००००० |
| १२७ | प्रभाग क्र. १६ श्रीकांत गायकवाड यांच्या ऑफीससमोर रोड व दोन्ही बाजूने नाल्या व त्यावर स्लॅब टाकणे | | | १०००००० |
| १२८ | प्रभाग क्र. १६ आंबेडकरपाटी पासून ते चंपत रोकडे यांचे घरापर्यत सिसि रोड ,नाल्या,वत्यावर स्लॅब टाकणे व स्ट्रिट लाईट बसविणे | | | १०००००० |
| १२९ | प्रभाग क्र. १६ चंपत रोकडे यांच्या घरापासून ते जवळेकराच्या घरापर्यत सिसि रोड ,नाल्या व त्यावर स्लॅब टाकणे | | | १०००००० |
| १३० | प्रभाग क्र. १६ कसबे गुरुजीच्या घरापासून ते कपिल किराणा दुकानापर्यत पाण्याची पाईप लाईन,डेनेज लाइन टाकणे | | | १०००००० |
| १३१ | प्रभाग क्र.१६ खालीद केंबल वाल्यापासून ते कपिल किराणा दुकानापर्यत पाण्याची पाईप लाईन,डेनेज लाइन टाकणे | | | १०००००० |
| १३२ | प्रभाग क्र.१६ संलग्न अल्पसंख्याक भागात नई आबादी येथे ८० ते १०० मिटरचे २५ गल्यामधील सिसि रोड,नाल्या,स्ट्रीट लाईट आणि नाल्यावर स्लॅब टाकणे अंदाजे २००० मिटर | | | २५०००००० |
| १३३ | प्रभाग क्र.१४ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे याचे नांव देवून हमालपुरा भागात मनपा जागेत सभागृहाचे बाधंकाम करणे | | | २५०००००० |
| १३४ | प्रभाग क्र.१४ इश्वर नगर भागातील बुध्द विहाराचे वाढीव बांधकाम करुन भगवान बुध्द मुर्तीची सुरक्षित स्थळी प्राणप्रतिष्ठा करण्याच्या कामासाठी व सभागृहाचे बाधंकाम करणे | | | १५०००००० |
| १३५ | प्रभाग क्र.१४ विष्णुनगर मुख्य रस्त्याच्या बाजूस सखल भाग असल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यासाठी मुख्य नालीचे बाधकाम करणे | | | ५०००००० |
| १३६ | प्रभाग क्र.२५ अरुण चौक ते इदगाह कमान रस्त्याचे हॉटमिक्स हॉटलेड पध्दतीने डांबरीकरण करणे | | | ३०००००० |
| १३६ | डॉक्टर लेन मधील डॉ.मनाठकर यांच्या दवाखान्यासमोरील ओपन स्पेसला संरक्षण भिंतीचे बांधकाम करुन या ओपनस्पेसमध्ये पदमश्री शामरावजी कदम नगर मध्ये पदमश्री शामरावजी कदम यांचा पुतळा उभारणे | | | २०००००० |
| १३७ | प्रभाग क्र.८ मध्ये ज्ञानेश्वरनगर भागात श्री लोखंडे ,श्री लाठकर यांचे घर ते जी.डी.कदम याचे घर ते काळे सर ते पांचाळ याचे घरासमोरील रस्त्याचे सिमेंट क्रॉक्रिटीकरण करणे. | | | १०००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३८ | प्रभाग क्र.८ मध्ये ज्ञानेश्वरनगर भागात श्री लाठकर यांचे घर ते उत्तमराव कदम याचे घर ते लेंडगे याचे घर ते कदम याचे घरासमोरील रस्त्याचे सिमेट क्रॉक्रिटीकरण करणे. | | | १०००००० |
| १३९ | प्रभाग क्र.८ मध्ये परिमल नगर मेन रोड गंदेवार यांच्या घरासमोरुन ते मोतेवार यांच्या घरापर्यत रस्त्याचे सिमेट क्रॉक्रिटीकरण करणे | | | १०००००० |
| १४० | प्रभाग क्र.८ मध्ये पांडूरंग बोखारे याचे घरा समोरील रस्त्याचे सिमेट क्रॉक्रिटीकरण करणे | | | ५००००० |
| १४१ | प्रभाग क्र.८ मध्ये बजाजनगर श्री बोबडे याचे घर ते जोशी यांच्या घरासमोरील रस्त्याचे सिमेट क्रॉक्रिटीकरण करणे | | | १०००००० |
| १४२ | प्रभाग क्र.८ मध्ये काबरानगर मोर चौक किराणा दुकान ते मेनरोडवला जोडणा-या रस्त्याचे सिमेट क्रॉक्रिटीकरण करणे | | | १०००००० |
| १४३ | प्रभाग क्र.३८ मध्ये नागलोक बुध्द विहार येथे कम्पाऊड वॉल व सी.सी.प्लॅटफार्म करणे | | | १०००००० |
| १४४ | प्रभाग क्र.३८ मध्ये डॉ.नरेशजी रायेवार याचे घरापासून ते सिडको स्मशानभूमी पर्यतच्या नाल्याचे बांधकाम करणेसाठी | | | ७५००००० |
| १४५ | प्रभाग क.७ मध्ये उल्हासनगर ,जिल्हा परिषद कॉलनी,अष्टविनायक नगर,सना कॉलनी,चक्रधरनगर ,येथे रसत्याचे मजबुतीकरण व सी.सी.रस्ते करण्यासाठी | | | ७५००००० |
| १४६ | प्रभाग क्र.३७ कौठा भागातील नविन पुलापासून (गोवर्धनघाट) ते जुन्या गावांत मारोती मंदिरापर्यतचा रस्ता सिसि करणे | | | १०००००० |
| १४७ | प्रभाग क्र.३७ विकास नगर मधील श्री पवार याचे घरापासून ते बालाजी मंदिरापर्यतचा रस्ता सिसि करणे | | | १०००००० |
| १४८ | प्रभाग क्र.३५ डॉ.अर्धापुरकर गल्ली रोडचे काम करणे | | | १०००००० |
| १४९ | प्रभाग क्र.३५ गायत्री मंदिर ते नविन पुल अर्धवट रोडचे काम करणे | | | १०००००० |
| १५० | प्रभाग क्र.३५ शाहु याचे दुकान ते कॉलेज टेकडी पर्यत नालीचे बांधकाम करणे | | | ५००००० |
| १५१ | प्रभाग क्र.३५ शिवाजी शाळेसमोर वजिराबाद येथील नॉव्हेल्टी दुकाना मागे ड्रेनेज लाईन टाकणे | | | १०००००० |
| १५२ | प्रभाग क्र.३५ पांचाली हॉटेल ते शिवपार्वती रोडचे काम करणे | | | १०००००० |
| १५३ | प्रभाग क्र.३५ गवळी गल्ली गुरुव्दारा रोड येथे नालीचे बाधकाम करणे | | | १०००००० |
| १५४ | प्रभाग क्र.३५ भालेराव दवाखाना ते बिकानेर दुकानापर्यत नालीचे बाधकाम करणे | | | १०००००० |
| १५५ | प्रभाग क्र.५ मध्ये शामनगर मध्ये सिसि रस्ता करणे | | | १०००००० |
| १५६ | प्रभाग क्र.५ मध्ये राजेंद्रनगर मध्ये सिसि रस्ता करणे | | | १०००००० |
| १५७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालाचे आयोजन करण्याकरीता ३.०० लक्ष व मागील वर्षातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यान मालाचे शिल्लक देयक देण्यासाठी २.०० लक्ष | १००००० | १००००० | ५००००० |
| १५८ | प्रभाग क्र.२९ मध्ये पोलिस चौकीच्या पाठी मागील मनपाकेच्या मोकळया जागेत व्यायाम शाळेचे बाधंकाम करणे | | | २०००००० |
| १५९ | १३ व्या वित्‍त आयोगाच्या प्राप्त निधीतून विकास योजनेत उद्यानासाठी आरक्षित असलेल्या ट्रेचिंग ग्रावुडच्या जागेला संरक्षित भिंतीचे बांधकाम करणे व जागेत असलेल्या कच्-याची विल्हेवाट लावण्यासाठी | | | १००००००० |
| १६० | प्रभाग क्र.१८ मध्ये लालवाडी नुरेईलाही चौक ते अंडरब्रिज पर्यत रस्त्याचे बाधकाम | | | ४५००००० |
| १६१ | प्रभाग क्र. १८ नरसिंह विद्यामंदिर पासून अंबिका योग कुटीर पासुन राहुल प्रधान यांच्या घरापर्यत सिसि रोड करण्यसाठी | | | ५०००००० |
| १६२ | प्रभाग क्र. १८ अभ्यासिकोच बांधकाम करण्यासाठी | | | ४००००००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६३ | आमदार, खासदार ,स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत प्राप्त होणा-या निधीतील कामे करण्यासाठी महानगरपालिका हिश्याची रक्मम भरण्यासाठी | | | ५०००००० |
| १६४ | प्रभाग क.१३ नंदीग्राम हौऊसिंग सोसायटी मधील अंतर्गत रस्ते व मलनिस्सारण लाईन टाकणे | | | ५००००० |
| १६५ | प्रभाग क्र.१३ खालसा हायस्कुल अंडर ग्रावुड ब्रिज व रस्ता बांधकाम | | | ५०००००० |
| १६६ | जेएनएनयुआरएम,बिएसयुपी व इतर शासन योजनेतील कामे पुर्ण करण्यासाठी | | | १००००००० |
| १६७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्य वर्षभर प्रत्येक महिण्याला विविध प्रभाग डॉ.बाबासहेब आंबेडकर व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठी | | | २५००००० |
| १६८ | प्रभाग क्र.६ मध्ये विविध ठिकणी सी.सी .रस्ते,आर.सी.सी.नालीचे बांधकाम ,पेव्हर्स बसविणे व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी | | | ३५००००० |
| १६९ | प्रभाग क्र. ११ बाबानगर येथील नगरोत्थान योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या अर्धवट रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी | | | २५००००० |
| १७० | प्रभाग क्र.४० हडको येथील शिवाजी उद्यान विकासित करणे | | | २५००००० |
| १७१ | प्रभाग क्र.४० हडको येथील इच्छापुर्ती हनुमान मंदिर परिसरातील अंतर्गत सिसि रस्ते व नाली बांधकाम | | | १५००००० |
| १७२ | प्रभाग क्र.४० शाहुनगर भागातील नाली व रस्त्याचे कामे करणे | | | ३०००००० |
| १७३ | प्रभाग क्र.४० हडको बस स्टण्ड ते बिएचएमएस कॉलेज पर्यतची विकास कामे | | | ७०००००० |
| १७४ | प्रभाग क्र.४० वाघाळा येथील उद्यान विकासित करणे | | | १०००००० |
| १७५ | प्रभाग क्र.४० वाघाळा येथील स्मशानभूमीचे कम्पांउड वॉल व शेड विकासित करणे | | | २५००००० |

JNNURM,BSUP नगरोत्थान,दलित वस्ती सुधार योजना तसेच इतर विविध योजने अंतर्गत झालेल्या विकास कामाची देखभाल व दुरुस्ती मध्ये रस्ता क्र.२४ बरकत कॉम्प्लेक्स ते ग्यान माता हायस्कुल व देगलुर नाका ते बर्की चौक पर्यतचा रस्ता हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्ती करण्यात यावी.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.